# प्रेसनोट दि. १९/०९/२०१९

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडुन स्पा मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणा-या स्पा सेंटरवर छापा टाकुन ५ परदेशी महिलांची सुटका

दि.१८/०९/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून झिवांका स्पा ॲन्ड वेलनेस सेंटर अशोका मॉल कोरेगाव पार्क येथे स्पा मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालु आहे अशी बातमी मिळाली सदर बाबत पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे, पोलीस उप निरीक्षक श्रीधर खडके व सामाजिक सुरक्षा विभागाकडील कर्मचारी यांनी बातमीची पडताळणी करुन झिवांका स्पा ॲन्ड वेलनेस सेंटर कोरेगाव पार्क पुणे येथे १७.१० वा अचानक छापा टाकुन आरोपी गोपाळ रमेश मिश्रा वय ३२ वर्षे रा सर्वे नं.१४ वार्ड नं.५ रामनगर क्रांती मित्र मंडळ जवळ गंगानिवास पुणे यास अटक करून त्यांने वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या पाच परदेशी पिडित मुलींची सुटका केली. तसेच सदर पिडीत मुलींना संरक्षण व पुनर्वसनकामी रेस्क्यु फाऊन्डेशन मुंढवा पुणे येथे रवाना केले आहे. सदर प्रकरणी आरोपी नामे गोपाळ रमेश मिश्रा याचे विरुध्द पोलीस उप निरीक्षक श्रीधर खडके यांनी कोरेगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं २५५/२०१९ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,७ भा.दं.वि. कलम ३७०,३७०(अ) अन्वये फिर्याद दिल्याने वरील गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई श्री.बच्चनसिंग पोलीस उप आयुक्त गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे व पोलीस उप निरीक्षक श्रीधर खडके यांचेसह सामाजिक सुरक्षा विभागाकडील म.पो.हवा मोहिते, पो.हवा. क्षिरसागर, म.पो.ना.शिंदे, पो.ना.माने, पो.ना.पठाण, पो.शि.कोळगे, पो.शि.खाडे व पो. शि चव्हाण, पो.शि भांडवलकर यांनी केलेली

(श्रीधर खडके)

पोलीस उप निरीक्षक
सा.सु.विभाग गुन्हे शाखा पुणे शहर